पनवेल (प्रतिनिधी) शासनाच्या माध्यमातून आदिवासी समाजासाठी विविध योजना आखल्या जात असून त्या सर्व योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे प्रामाणिक प्रयत्न झाले पाहिजेत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज उलवा नोड येथे केले.

आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन, अप्पर आयुक्त आदिवासी विकास ठाणे अंतर्गत विभागीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन पनवेल तालुक्यातील उलवा नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस कॉम्प्लेक्समध्ये करण्यात आले आहे. दि.०६ ते ०८ डिसेंबरपर्यंत होणाऱ्या या क्रीडा स्पर्धेत ठाणे, डहाणू, पेण, जव्हार, शहापूर, सोलापूर, घोडेगाव (पुणे) या प्रकल्पातील एकूण १०९१ खेळाडूंनी सहभाग घेतला असून या स्पर्धेचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते व आदिवासी विकास ठाणे अप्पर आयुक्त सुधीर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (शनिवार, दि.०६) झाले. त्याप्रसंगी आ.ठाकूर बोलत होते.

स्पर्धांमध्ये हार-जीत होत असते, त्याची चिंता करायची नसून शिस्तीचे पालन करीत खेळाडूवृत्ती जपणे गरजेचे आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी खेळाडूंशी संवाद साधताना म्हंटले.ते पुढे म्हणाले की, आदिवासी समाज डोंगरदऱ्यात राहत असला तरी त्यांच्याकडे सांस्कृतिक वारसा आहे. राकट आणि मेहनती असलेल्या या समाजातील आज अनेक तरूण विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून आपले आणि समाजाचे नाव उंचावत आहेत. विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करून आदिवासी विकास विभाग आदिवासी विद्यार्थ्यांना संधी देण्याचे महत्वपूर्ण काम करीत आहे, असेही आ.ठाकूर म्हणाले. खेळाडूंचे अंगभूत कौशल्य विकसीत करण्याच्या दृष्टीने रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस कॉम्प्लेक्स सतत काम करीत असल्याचेही त्यांनी नमूद करून आदिवासी विद्यार्थ्यांच्या उत्कर्षासाठी आपण सदैव प्रयत्नशिल राहू, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी बोलताना सांगितले.

या कार्यक्रमास रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, ठाणे प्रकल्प उपायुक्त किरण माळी, शहापूर प्रकल्प अधिकारी लोमेस सलामे, पेण प्रकल्प अधिकारी एच.आर.भोसले, डहाणू प्रकल्प अधिकारी श्री.मेरकर, बी.के.लोंढे, चेतन खैरनार, श्री.वडगावकर, धनंजय वेडदे, यांच्यासह विविध विद्यालयांचे मुख्याध्यापक, प्रशिक्षक, शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते